महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०४/४२४/४३४
ई-मेल-desk4a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

**परिपत्रक :**

क्रमांक : ४-४३अ/आस्था/कॅस/२०२६/९२० दिनांक : ३० मार्च, २०२६

**विषय :** तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी तसेच पदविका संस्थांमधील अध्यापकांना पाचव्या, सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार करियर अॅडव्हान्समेंट योजनेंतर्गत (CAS) लाभ मंजूर करण्यासाठी ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती भरण्याबाबत...

**संदर्भ :** १) संचालनालयाचे परिपत्रक क्र. ४-४३अ/आस्था/कॅस/२०२६/७५, दि. २८-०२-२०२६
२) संचालनालयाचे परिपत्रक क्र. ४-४३अ/आस्था/कॅस/२०२६/९४, दि. १२-०३-२०२६

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / अशासकीय अनुदानित स्वायत्त व अस्वायत्त पदवी तसेच पदविका संस्थांमधील अध्यापकांना पाचव्या, सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार करियर अॅडव्हान्समेंट योजनेंतर्गत (CAS) लाभ मंजूर करण्यासाठी ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती भरण्याबाबतच्या सूचना उपरोक्त संदर्भाधिन क्र. १ च्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यांत आलेल्या आहेत.

तसेच, सदरच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये (Online Module) माहिती भरताना संबंधित अध्यापकांकडून CAS योजनेंतर्गत अनुज्ञेय लाभासाठी निश्चित केलेल्या अटी, जसे की, प्रशिक्षण (Training), पूर्वसेवा (Past Service), नियुक्ती स्वरुप, शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेणी/स्तर/लेव्हल. इ. विविध मुद्यांबाबत होत असलेल्या विचारणांच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्र. २ च्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यांत आल्या आहेत.

त्यास अनुसरुन आज दि. ३० मार्च, २०२६ पर्यंत सुमारे २४०० अध्यापकांनी सदरच्या पोर्टलवर माहिती भरली असून, त्यापैकी ८० टक्के अध्यापकांनी सदरच्या माहितीची निश्चिती (Confirm) केलेली आहे. तथापि, बऱ्याचश्या अध्यापकांनी अद्यापही माहितीची निश्चिती (Confirm) केलेली नाही. तसेच बऱ्याचश्या अध्यापकांनी ई-मेल व्दारे व दूरध्वनीव्दारे सदरच्या प्रणालीमध्ये माहिती भरण्यासाठी मुदतवाढ देण्याची विनंती केलेली आहे. सदरची बाब विचारात घेता, एक अंतिम संधी म्हणून CAS योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करण्यासाठीचे स्तरनिहाय वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारित करण्यांत येत आहे.

| | स्तर / टप्पा | सुधारित कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | संबंधित अध्यापकांनी ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती भरणे | दि. ६ मार्च, २०२६ ते दि. १० एप्रिल, २०२६ पर्यंत |
| २ | संबंधित संस्थेचे संस्थाप्रमुख | दि. ३० मार्च, २०२६ ते दि. २० एप्रिल, २०२६ पर्यंत |
| ३ | सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये | दि. २१ एप्रिल, २०२६ ते दिनांक १० मे, २०२६ पर्यंत |

उपरोक्त मुदतवाढ ही अंतिम असून, दिनांक १० एप्रिल, २०२६ या दिनांकापर्यंत जे अध्यापका त्यांच्या माहितीची निश्चिती (Confirm) करणार नाहीत, अश्या अध्यापकांची प्रकरणे सद्यस्थितीत या टप्प्यामध्ये निकाली निघू शकणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी. त्यामुळे सर्व संस्थाप्रमुखांनी संस्थेतील अध्यापकांकडून सदरची माहिती ही उपरोक्त कालमर्यादेत पूर्णपणे ऑनलाईन भरुन घ्यावी.

( डॉ. विनोद मोहितकर )
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :

१) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर. त्यांना कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय तसेच अशासकीय अनुदानित संस्थेच्या संस्था प्रमुखांना याबाबत अवगत करण्यांत यावे.

२) प्राचार्य, सर्व शासकीय तसेच अनुदानित पदवी व पदविका संस्था. त्यांना कळविण्यांत येते की, सदरची बाब संस्थेतील लाभार्थी अध्यापकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

३) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व तंत्र शिक्षण मंडळ तसेच मंडळाच्या अधिनस्त विभागीय कार्यालयात कार्यरत शिक्षकीय संवर्गातील अधिकाऱ्यांच्या संदर्भातील कार्यवाहीसाठी.



Scanned with OKEN Scanner